ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादी
विषयांस वाहिलेले
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारी
प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७


दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80 Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार १९ ऑक्टोबर, १९६६ | अंक २०


## शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें


भारतांतील निरनिराळ्या राज्यामधून वीज निर्मितीच्या योजना कार्यवाहीत आल्यामुळें शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें खुलीं झालीं आहेत. आज खेड्यापाड्यांतून शेतीसाठीं लिफ्ट इरिगेशन, शहरी व ग्रामीण पाणी पुरवठा व इतर लहानमोठ्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा किर्लोस्कर पंपिंग सेटस कार्यक्षमतनें करूं शकतात. आपल्या योजनेसाठीं कोणता किर्लोस्कर पंप सेट निवडावा याबाबतचा तांत्रिक सल्ला आपल्याला आमचेकडून विनामूल्य मिळूं शकेल.





वैशिष्ट्यें :
- डबल सक्शन
- मजबूत बांधणी व दीर्घकाल टिकाऊं
- कार्यक्षम व काटकसरी
- ग्रीज कमी व दुरुस्तीस सोपा

**किर्लोस्कर**
रजि. ट्रे. मा.



टाइप "यूपी"
५ ते ३०० हॉ. पॉ. पंपिंग सेट
उत्पादक
**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**
किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली

**पाकिस्तानला इटलीची मदत**—अणुशक्तीचा शांततामय कामासाठी उपयोग करण्याच्या बाबतीत पाकिस्तानला मदत करण्याची तयारी इटलीने दाखविली आहे. उभयता देशांच्या अणुशक्ती मंडळाच्या अध्यक्षांनी ह्यासंबंधी एकमेकांना पत्रे पाठविली आहेत. इटलीच्या सरकारने आपल्या अणुशक्तिकेंद्रात पाकिस्तानी शास्त्रज्ञांना शिक्षण देण्याची तयारीही दाखविली आहे.

**कृष्णा नदीत मच्छीमारी केंद्र**—आंध्र राज्यातून वाहणाऱ्या कृष्णा नदीत एक मच्छीमारीचे केंद्र उघडण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे. कृष्णा नदीच्या पात्रातील ३६ छोट्या बेटांतील कोळ्यांचा त्यामुळे फायदा होणार आहे. ह्या भागात २,५०० कोळी हा व्यवसाय करीत आहेत. त्यांना आधुनिक पद्धतीची मासे पकडण्याची अवजारे पुरविण्यात येतील. त्यामुळे माशांच्या व्यवहारात दुपटीने वाढ होऊ शकेल.


नित्य वदावे—काशीस जावे......

असं म्हणत असतानासुद्धा तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेण्याची तुमची इच्छा कदाचित अपुरीच राहून जाईल. यासारख्या कार्याकरिता तुम्ही योजनाबद्ध बचत कराल तर ते यथाकाली सहज शक्य होईल. बचतीकरिता 'बेळगांव बँके'त खाते सुरू करा. तुमच्या खिशास सहज परवडणाऱ्या अनेक लाभदायक योजनांपैकी कोणतीही निवडा.

* दि बेळगांव बँक लिमिटेड *

स्थापना : १९३० ] [ रजि. ऑफिस—रविवार पेठ, बेळगाव.

महाराष्ट्र, म्हैसूर राज्य व गोमांतकात एकूण ३८ शाखा आपल्या सेवेसाठी आतुर आहेत.



दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( रजिस्टर्ड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २ )

स्थापना : १६ सप्टेंबर १९३५

| | १९५५ | १९६० | १९६६ |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. १६ लक्ष | रु. ३२ लक्ष | रु. १ कोटी |
| गंगाजळी | रु. ७·७५ लक्ष | रु. १७ लक्ष | रु. ३७ लक्ष |
| ठेवी | रु. ५ कोटी | रु. १५ कोटी | रु. ५० कोटींहून अधिक |

आपल्या १०९ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध

विदेश विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टी सेवा यांच्यासह बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सविस्तर माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

कर्वे रोड, ( पुणे-४ ), नौपाडा ( ठाणे ), कॉफर्ड मार्केट ( मुंबई ) येथे लौकरच शाखा सुरू होत आहेत.

चिं. वि. जोग,
जनरल मॅनेजर.

# ॥ अर्थ ॥

बुधवार, १९ ऑक्टोबर, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कामगारांच्या वेतनाबद्दल महत्त्वाचा निर्णय
### सुप्रीम कोर्टाचा निवाडा

सरकारी क्षेत्रातील कंपनी आणि खासगी क्षेत्रातील कंपनी ह्यांच्या कामगारांच्या मोबदल्याचे पद्धतीत फरक असण्याचे कारण नाही, हा सुप्रीम कोर्टाचा निर्णय दूरगामी परिणामाचा आहे. मालकीचे स्वरूप किंवा नफा कोणाच्या वाट्यास जातो, ह्याचा वेतन ठरविण्याशी काहीही संबंध नाही, असे हिंदुस्थान् ॲंटीबायॉटिक्सचे अपील फेटाळताना न्यायमूर्ती सुबराव ह्यांनी स्पष्ट सांगितले. सरकार दिवसेंदिवस स्वतःकडे अधिकाधिक औद्योगिक उत्पादनाची कामे घेत आहे; तेव्हा सरकारचे प्रत्यक्ष नोकर आणि सरकारी कारखान्यांतील कामगार ह्यांच्या नोकरीच्या अटीसंबंधी तत्त्वे स्पष्ट केली जाणे अगत्याचे झाले आहे. खासगी क्षेत्रातील कामगारांना अधिक चांगले वेतन मिळवून देण्याचे बाबतीत सरकार उदार असते, पण स्वतःच्या मालकीच्या कारखान्यांतील कामगारांचे बाबतीत हात आखडता घेते, असा अनुभव आहे. सरकारी कारखान्यांचे उद्दिष्ट नफा करणे हे नसते; ते व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने चालविण्यात येतात, हे सरकारचे समर्थन सुप्रीम कोर्टाने गैरलागू ठरविले. खासगी क्षेत्रांतील ५८ लक्ष कामगारांना जे वेतन मिळते ते सरकारी क्षेत्रातील ९० लक्ष कामगारांना नाकारणे राज्य घटनेस धरूनही नाही. गेल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ज्या गतीने खासगी क्षेत्रातील कामगारसंख्या वाढली, तिच्या दुप्पट गतीने ती सरकारी क्षेत्रात वाढली; चवथ्या पंचवार्षिक योजनाकाळात ही प्रवृत्ती आणखीच बळावणार आहे. तेव्हा, सुप्रीम कोर्टाने योग्य वेळीच सरकारला कानपिचक्या दिल्या आहेत. त्यामुळे सरकारचे धोरण अधिक वास्तव होण्यास मदत होईल.

---

### हिंदला द्यावयाच्या मदतीबद्दल मतभेद

भारताच्या आर्थिक धोरणाबद्दल जागतिक बँक आणि अमेरिकेचे परराष्ट्रखाते ह्यांच्यांत गेल्या काही महिन्यांत मतभेद आणि तेढ उत्पन्न झाल्याची वार्ता आहे. हिंदला मदत देण्याचा जो कार्यक्रम भारत-मदत-मंडळाने तयार केला आहे त्याची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत त्यामुळे विलंब होत असावा अशी शंकाही व्यक्त करण्यात येत आहे. भारताच्या रुपयाचे अवमूलन करण्याची सूचना प्रथम जागतिक बँकेनेच केली होती व नंतर तिने त्याला मान्यताही दिली. ह्या बाबतीत अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याची भूमिका काहीशी वेगळी होती, असे आता सांगण्यात येत आहे. रुपयाचे अवमूलन केल्यामुळे भारताच्या आर्थिक व सामाजिक स्थैर्यावर आघात होईल अशी भीति खात्याला वाटत होती. भारतामधील अलीकडील घडामोडी पाहता ही भीती अस्थानी नव्हती असे म्हणता येण्यासारखे आहे. जागतिक बँक आणि परराष्ट्र खाते ह्यांच्यांतील तेढीमुळे भारत-मदत-मंडळाच्या इतर सभासदांतही उपेक्षेची भावना बळावत असल्याची चिन्हे दिसत आहेत. परिणामी मदत मंडळाची बैठक पुढील वर्षी फेब्रुवारी अगर मार्च महिन्यापर्यंत लांबण्याची शक्यता आहे. असे असले तरी येत्या नोव्हेंबरमध्ये पॅरिसमध्ये मदत मंडळाची सभा भरण्याचा संभव आहे. ह्या सभेत कर्जाच्या परतफेडीच्या फेरव्यवस्थेचाच मुख्यतः विचार करण्यात येणार आहे. मंडळाने भारताला चालू वर्षी जितकी मदत देण्याचे कबूल केले होते त्यापैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक बिगर प्रकल्प मदत आतापर्यंत देण्यात आलेली आहे. ही रक्कम सुमारे ८१ कोटी डॉलर्सची आहे. उरलेली मदत देण्यात येण्यापूर्वी मदत मंडळाच्या सभासद राष्ट्रांशी करार होण्याची आवश्यकता आहे. या उर्वरित मदतीत अमेरिकेकडून १० कोटी डॉलर्स यावयाचे आहेत.

---

### तुटीच्या अंदाजपत्रकाची भरपाई कशी करणार ?

नियोजन समितीने तुटीचे अंदाजपत्रक करून त्याची भरपाई नवीन नोटा छापून करावयाची नाही असे जाहीर केलेले आहे. तथापि सरकारांची आर्थिक परिस्थिती ह्या निर्धाराला पोषक ठरण्याची लक्षणे दिसत नाहीत. गेल्या काही महिन्यांत अंदाजपत्रकांची परिस्थिती घसरल्याची वार्ता आहे. सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नात बरीच घट झालेली असून सार्वजनिक खर्चात मात्र वाढ झालेली आहे. त्यामुळे मध्यवर्ती व राज्य सरकारांच्या अंदाजपत्रकातील एकूण तूट चालू आर्थिक वर्षअखेर ३०० कोटी रुपयांच्या घरात जाण्याची शक्यता आहे. मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकात १८० कोटी रुपयांची खोट येईल असा अंदाज करण्यात आलेला होता. परंतु आता ही खोट २०० कोटींच्याही पुढे जाईल असा रंग दिसत आहे. इतक्या मोठ्या रकमेची तूट ही फार मोठी आहे; ही सर्व तूट नवीन कर बसवून भरून काढता येणे अशक्य कोटीतील आहे, असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. ही तूट भरून काढण्याचा व्यवहार्य मार्ग कोणता, असा प्रश्न उभा राहिला आहे. शिवाय पुढील वर्षी निवडणुका होणार आहेत. अशा वेळी उत्पन्न वाढविण्याच्या मार्गावर सरकार काही पावले टाकील तर ते अडचणीचे ठरणार आहे. जमिनीवरील सारा वाढविणे, पाणीपुरवठ्याचे दर वाढविणे, व्यापारी पिकांवर खास जादा कर बसविणे, इत्यादी उपाय मध्यवर्ती व राज्य सरकारांना अजूनही उपलब्ध होऊ शकतील. परंतु निवडणुकीच्या वातावरणात असे कांही करणे कठीण आहे. तात्पर्य, अंदाजपत्रकातील तूट ही नव्या नोटा छापूनच भरून काढावी लागणार असे दिसत आहे. म्हणजे महागाईची चढती कमान आलीच.

---

### दिल्ली कुणालाच सोडायला नको

" सरकारी नोकरांना वयाच्या ५८ व्या वर्षानंतर निवृत्त व्हावे लागते, पण राजकीय पुढाऱ्यांवर काहीही बंधन नाही. मी ६९ वर्षांचा झालो असलो, तरी लोकसभेच्या तिकिटासाठी माझा अर्ज आहेच. दिल्ली कुणालाच सोडायला नको आहे " असे उद्गार श्री. मेहरचंद खन्ना ह्या मध्यवर्ती मंत्र्याने काढले आहेत.

## कारखानदार आणि कामगार ह्यांचेमधील जिव्हाळा

मुंबई येथील रोटरी क्लबांत श्री. विजय मर्चंट ह्यांचे अलीकडे एक भाषण झाले. कारखानदार आणि कामगार ह्यांच्यातील संबंध प्रयत्न केल्यास जिव्हाळ्याचे नाही तरी निदान सलोख्याचे कसे ठेवता येतात ह्यासंबंधी त्यांनी सांगितलेली अनुभवजन्य माहिती बोधप्रद वाटते. ठाकरसी समूहांतील कापड गिरण्यांपैकी हिंदुस्थान मिल्सचे कार्यकारी डायरेक्टर म्हणून ते काम पाहात असतात. ह्या गिरणींतील कामगार आणि चालक ह्यांचे संबंध आपुलकीचे कसे होत चालले आहेत हे सांगताना ते म्हणाले, की कारखान्यांच्या कारभारांत कामगारांना भागीदार करण्याची घोषणा केवळ राजकीय असे मानण्याचे कारण नाही. कामगारांची खरी इच्छा ह्यापुढची मजल मारण्याची असते. त्यांना चालकांबरोबर कौटुंबिक स्वरूपाचे निकटचे संबंध जुळविण्याची इच्छा असते. हिंदुस्थान गिरणींत चालकांनी कामगारांचे वैयक्तिक प्रश्न समजून घेण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या प्रश्नाकडे सहानुभूतीने व समजूतदारपणाने पाहण्याचे धोरण ठेवले. लोभी सावकारांच्या कर्जाच्या विळख्यांतून कामगारांना सुटता यावे म्हणून त्यांना सवलतीने कर्जे देण्यात येतात. त्यांना जागा मिळवून देण्याची खटपट करण्यात येते आणि कामगार विमा योजनेपलीकडे जाऊन वैद्यकीय मदतही देण्यात येते. मुंबईमधील कापड गिरण्यात कामगार व चालक ह्यांचा प्रत्यक्ष संबंध नसतो; कामगारांच्या प्रातिनिधिक संघटनांमार्फतच उभयतांचा संबंध येत असतो. स्वतःचा अनुभव सांगतांना त्यांनी पुढे असे सांगितले की कामगारांना संपावर जाण्याची इच्छा नसते; परंतु त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध संपावर जाण्यास भाग पाडण्यात येते.

---

## डिझेल इलेक्ट्रिक एंजिनांच्या युगास प्रारंभ

हिंदमधील रेल्वे मार्गावर धावणाऱ्या ६ गाड्या आता डिझेल इलेक्ट्रिक एंजिनांच्या साह्याने ओढण्यात येणार आहेत. लांबवर प्रवास करणाऱ्या गाड्यांसाठी ही एंजिने म्हणजे वरदानच ठरणार आहेत. शेकडो मैल अंतर कापणाऱ्या गाड्या आतापर्यंत वाफेची एंजिनेच मुख्यतः ओढत असत. अशा गाड्यांतून धुराचा त्रास खूप होतो; शिवाय वाफेच्या एंजिनांच्या शक्तीला व गतीला मर्यादा असतात त्या वेगळ्याच. नवीन एंजिनांच्या साह्याने दूरचा प्रवास अधिक लवकर उरकता येणार. मुंबई ते दिल्ली हे अंतर कापण्यास सामान्यतः ३० तास लागत असत. आता हे अंतर सुमारे २३ ते २४ तासांत तोडण्यात येईल. भारतामधील सर्वत्र दूर पल्ल्याच्या गाड्यांना डिझेल एंजिने जोडण्यास अद्याप १० वर्षांचा तरी काळ लागणार आहे. पण त्याची सुरुवात झाली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. भारतीय रेल्वेजवळ वाफेच्या एंजिनांची संख्या खूपच मोठी आहे. त्यांचा एकदम त्याग करता येणार नाही. चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनांच्या कारखान्याने ऑगस्ट १९६६ पर्यंत २ हजारांवर एंजिने तयार केलेली आहेत. सध्या ह्या कारखान्यात दरमहा १० वाफेची एंजिने तयार करण्यात येतात. डिझेल एंजिने वापरण्याची प्रवृत्ती वाढत जाणार हे ओळखून आता ह्या कारखान्यातील उत्पादन दरमहा ४ पर्यंत आणण्यात येणार आहे. पंचवार्षिक योजनेअखेर ह्या कारखान्यातून फक्त विजेची एंजिनेच तयार करण्यात येतील. अमेरिकेत डिझेल एंजिने वापरण्यात येऊ लागली तेव्हा ४० हजार वाफेची एंजिने एकदम टाकाऊ म्हणून रद्द करण्यात आली. भारताला अर्थात असे करणे परवडणार नाही.

## खंबायतच्या आखातातील तेलाचा शोध

खंबायतच्या आखाताजवळच्या किनाऱ्याजवळ तेलाचा शोध करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. तेलाच्या विहिरी खोदण्याच्या कामी एका अमेरिकन कंपनीशी लवकरच करार करण्यात येणार आहे. भारत सरकार आणि तेल कंपनी ह्यांच्यात करण्यात यावयाच्या कराराच्या अटींसंबंधी चर्चा पूर्ण झाली असून कराराचा मसुदाही तयार झाला आहे. खंबायतच्या आसपासच्या समुद्रतळाची तेलाच्या साठ्याच्या दृष्टीने पाहणी करण्यात आलेली आहे. हे काम भारताच्या तेल आणि नैसर्गिक वायुमंडळाने आणि रशियन भूगर्भशास्त्रज्ञांच्या एका तुकडीने केलेले आहे. तेलाच्या विहिरीच्या खोदाईचे काम करण्याची तयारी ॲशलँडस ह्या अमेरिकन कंपनीने दाखविली आहे. सुमारे १० हजार चौरस किलोमीटर क्षेत्रफळात हे काम करण्याची तयारी कंपनीने दाखविली आहे. तथापि, तेल सांपडण्याची शक्यता मात्र ह्याच्या ५ पट क्षेत्रफळात आहे. ॲशलँडस कंपनीने खोदलेल्या विहिरीत जर तेल सापडले नाही तर त्याचा सर्व खर्च कंपनी सोसण्यास तयार आहे. मात्र ज्या विहिरीतून तेल सांपडले त्याच्यासाठी झालेल्या खोदाईच्या खर्चापैकी निम्मा खर्च भारत सरकारने द्यावयाचा आहे. खोदाईचे काम सुरू करण्यासाठी कंपनीला १·५ कोटी डॉलर्स प्राथमिक खर्च करावा लागणार आहे. उपलब्ध झालेले तेल भारत सरकारला विकण्यात येणार असून त्याची किंमत रुपयाच्या चलनात घेण्याची तयारीही कंपनीने दाखविली आहे. प्रथम तेलाची किंमत डॉलर्समध्ये देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. कंपनीचा कारभार पाहण्याचे सर्व हक्क काही ठराविक काळापर्यंत अमेरिकन कंपनीच्या स्वाधीन राहतील.

## सिनेमा पाहणाऱ्या रसिकांच्या सवयी

मुंबईमधील एका जाहिरात कंपनीने सिनेमा-प्रेक्षकांच्या सवयींविषयी माहिती गोळा करून त्यासंबंधी आकडेवार चिकित्सा केली आहे. त्यावरून असे आढळून आले आहे की, इंग्रजी चित्रपट पाहणाऱ्यांची टक्केवारी बृहन्मुंबईत सर्वांत जास्त म्हणजे ३१ टक्के आहे. कंपनीने केलेल्या ह्या पाहणीला अंधारातील चेहरे असे नाव देण्यात आले असून चित्रपटांच्या लोकप्रियतेचीही चाचणी करण्यात आली आहे. इतर भाषांतील चित्रपटांपेक्षा हिन्दी भाषेतील चित्रपट अधिक लोकप्रिय असल्याचे पाहणीत आढळून आले. बृहन्मुंबईतील इंग्रजी चित्रपट पाहणाऱ्यांत ३६ टक्के स्त्रिया असतात व २८ टक्के पुरुष असतात. हिंदी चित्रपटांच्या प्रेक्षकांत मात्र स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या अधिक असते. मुंबई सोडून महाराष्ट्रात इतर ठिकाणी मराठी चित्रपट पाहणारांत स्त्रियांची टक्केवारी ७७ आहे तर पुरुषांची टक्केवारी ७० आहे. हिंदी चित्रपट पाहणाऱ्यात ९० टक्के प्रेक्षक पुरुष असतात व ७२ टक्के स्त्रिया असतात. इंग्रजी चित्रपट पाहण्याची प्रवृत्ती वाढत्या उत्पन्नाच्या गटातून विशेष दिसून येते. ज्या कुटुंबांचे उत्पन्न दरमहा ७०० रु. च्या पेक्षा अधिक आहे त्यातून इंग्रजी चित्रपट प्रेक्षकांची ५० टक्क्यांपेक्षा अधिक भरती झालेली असते. एकंदरीने चित्रपट पाहण्याची प्रवृत्ती वाढत चाललेली आहे. बृहन्मुंबईत ४६ टक्के लोक महिन्यातून एकदा तरी चित्रपट पाहतात. महाराष्ट्रात इतर ठिकाणी ३७ टक्के लोक दरमहा एक चित्रपट पाहतात. सिनेमा पाहण्याची प्रवृत्ती स्त्रियांत पुरुषांच्या मानाने अद्याप कमी आहे. उत्पन्न वाढले की सिनेमाला जाण्याची प्रवृत्तीही वाढते. वाढत्या वयाबरोबर ही प्रवृत्ती कमी होत जाते असाहि निष्कर्ष काढण्यात आला आहे.

### इस्पितळांत होणारी अन्नाची नासधूस

अन्नाची नासधूस ही केव्हाही वाईटच; आजच्या अन्नधान्याच्या टंचाईच्या परिस्थितीत तर ती गर्हणीयच म्हटली पाहिजे. रुग्णसेवा करणाऱ्या इस्पितळांतून तरी ती टाळता आली पाहिजे. पण पंजाबमधील इस्पितळांतून अशी नासधूस चालू असल्याच्या वार्ता आहेत. इस्पितळांत दाखल झालेल्या रोग्यांना वाटल्यास स्वतःच्या घरचे अन्न आणण्याची मुभा असते. परंतु ही सवलत मिळविण्यासाठी त्यांना दोन रुपये द्यावे लागतात. इस्पितळातील अन्न घेतल्यास ही फी द्यावी लागत नाही. म्हणून बरेच रुग्ण इस्पितळांतील अन्न घेणार असल्याचे लिहून देतात आणि फी देण्याचे टाळून घरचे अन्न घेतात. परिणामी त्यांच्यासाठी तयार केलेले इस्पितळातील अन्न वाया जाते अगर कुत्र्याच्या किंवा गुरांच्या भक्ष्यस्थानी पडते. अर्थात इस्पितळांचा ह्या अन्नावरील खर्च नाहक होत असतो.

---

### मुंबईतील तयार कपड्यांची बंगालवर स्वारी

कापड घेऊन, शिंप्याला माप देऊन कपडे करवून घेण्याची पद्धत अमेरिकेसारख्या देशांतून नाहीशीच झालेली आहे. कारण ही पद्धत फार श्रीमंतांनाच परवडणारी झालेली आहे. भारतातही मोठ्या शहरांतून तयार कपडे घेण्याची प्रवृत्ती अनेक कारणांमुळे वाढत चाललेली आहे. मुंबईत अशा कपड्यांचे यांत्रिक कारखाने आहेत. त्यांतून तयार झालेल्या कपड्यांनी कलकत्त्यावर स्वारी केली आहे. हे कपडे हा हा म्हणता खपत आहेत. पश्चिम बंगालमध्ये केलेल्या कपड्यांपेक्षा ते अधिक नेटके आणि आकर्षक आहेत. खुद्द बंगाल सरकारने राज्यांतील कारखान्यांत तयार करण्यात आलेले कपडेच लोकांनी वापरावे असे आवाहन केले आहे. राज्याबाहेरील आकर्षक कपडे पश्चिम बंगालमध्ये आल्यास स्थानिक कारखान्यांना अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे.

---

### जवानांसाठी टिकाऊ खाद्य पदार्थांची पाकिटे

म्हैसूर येथील अन्नसंशोधन प्रयोगशाळेत जवानांसाठी वजनाने हलकी व टिकाऊ अशी खाद्यपदार्थांची पाकिटे बनविण्यात आली आहेत. प्रत्येक पाकिटाचे वजन अवघे ५·८ किलोग्रॅम असून त्यात ५ जवानांना एक दिवस पुरेल असे मिश्र अन्नपदार्थ भरलेले असतात. त्यामधील अन्नाचे सेवन केल्याने प्रत्येक सैनिकास दररोज ३,१०० कॅलरी उष्णता देणारे खाद्य मिळू शकेल. अन्नपदार्थ दुर्गम विभागात विमानाने टाकण्यात येऊन त्यांची चांचणीही घेण्यात आली आहे. ह्याशिवाय आणखी दोन प्रकारचे टिकाऊ अन्नपदार्थ तयार करण्यात आले आहेत. त्यांपैकी एक गव्हापासून बनविण्यात आला असून दुसरा गहू व तांदूळ ह्यांच्या मिश्रणापासून तयार केलेला आहे. अतिशय उंच ठिकाणी व कडाक्याच्या थंडीच्या ठिकाणी उपयोगात आणता येतील असे खाद्यपदार्थही बनविण्यात आले आहेत.

---

### शिखांचा मँचेस्टरमधील विजय

मँचेस्टरच्या सिटी कौन्सिलने ७१ विरुद्ध २३ मतांनी ठराव मंजूर करून तेथील शीख बस ड्रायव्हरांना त्यांनी नेहमीची पगडी घालण्यास संमती दिली. गेली सात वर्षे ह्याबाबत लढत चालू होती, ती अखेर शिखांनी जिंकली. त्यानिमित्त मँचेस्टरमधील २,००० शिखांनी आपल्या गुरुद्वारात कृतज्ञता व्यक्त केली.

---

### घटस्फोटानंतर लागलीच विवाह करू इच्छिणारांना उद्बोधक निवाडा

बरेली येथील अविनाश प्रसाद श्रीवास्तव ह्यांना हायकोर्टाच्या हुकुमान्वये घटस्फोट मिळाला आणि त्यांनी दुसरा विवाह केला. दुसऱ्या पत्नीपासून त्यांना मुलगा झाला. इकडे, त्यांची पहिली पत्नी चंद्रमोहिनी श्रीवास्तव हिने सुप्रीम कोर्टाकडे अपील केले. "ह्या अपीलाची मला माहिती नव्हती; ते अपील नाकारण्यात यावे; नाहीतर माझा हा मुलगा अनौरस ठरेल" अशी श्रीवास्तव ह्यांनी सुप्रीम कोर्टाला विनंती केली, पण ती नाकारण्यात येऊन सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाचा निवाडा फिरवला आणि घटस्फोट रद्द ठरविला. "श्रीवास्तव ह्यांनी अलाहाबाद हायकोर्टाच्या निवाड्यानंतर दुसरा विवाह करण्यात बेकायदेशीर काही केले नाही, पण दावा हरणाऱ्या व्यक्तीचा सुप्रीम कोर्टाकडे जाण्याचा हक्कही हिरावून घेता येणार नाही. दुसऱ्या पत्नीला झालेले अपत्य औरस का अनौरस, ह्याचा आम्ही विचार करण्याचे कारण नाही. अशा परिस्थितीत हिंदू मॅरेज ॲक्टाचे १० वे कलम नव्या अपत्याच्या मदतीस येऊ शकेल, एवढेच आम्ही सांगू शकतो;" असे न्यायमूर्ती वांचू ह्यांनी उद्गार काढले.

### अवमूलनामुळे झालेला नफा करपात्र नाही

कॅनरा बँकेच्या कराची शाखेकडून मंगलोर येथील मुख्य कचेरीकडे यावयाची रक्कम रुपयाच्या १९४९ मधील अवमूलनामुळे १,७३,८१७ रुपयांनी वाढली; म्हणजे बँकेला तेवढी रक्कम जास्त मिळाली. त्याचे स्वरूप नफा हे नसून भांडवली वाढाव्याचे आहे, असे सुप्रीम कोर्टाने ठरविले; हायकोर्टाच्या निवाड्यावर म्हैसूरच्या कमिशनर ऑफ इनकमटॅक्सने केलेले अपील फेटाळून लावले.


# दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड

## मुख्य कचेरी : सातारा (महाराष्ट्र)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २० लाख |
| वसूल भांडवल | रु. १२ लाखांचेवर |
| खेळते भांडवल | रु. ६ कोटी, ५० लाखांचेवर |
| गंगाजळी | रु. ८ लाख, ५० हजारांचेवर |
| ठेवी | रु. ५ कोटी, ५० लाखांचेवर |

## शाखा सत्तावीस

मुदतठेवी आकर्षक व्याजाने स्वीकारल्या जातात.

रा. ना. गोडबोले, अध्यक्ष संचालक मंडळ

वि. श्री. वामले, जनरल मॅनेजर

**अमेरिकेतील शेतकऱ्याचा अभ्यास**—न्यूयॉर्क राज्यांतील एक गणितज्ज्ञ व शेतकरी बुलढाणा जिल्ह्यांतील एका खेडेगांवच्या महाराष्ट्रीय कुटुंबांत १५ दिवस राहणार आहे. हा शेतकरी एका युवक संघटनेचा सभासद आहे. हिंदुस्थानातील शेतकऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या जीवनाची सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी समजून घेण्याचे प्रयत्न तो करणार आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील विकासाच्या व शिक्षणाच्या कार्याची पाहणीही तो करणार आहे. शेतकरी व विद्यार्थी ह्यांच्या आंतरराष्ट्रीय देवघेवीच्या योजनेतील हा एक उपक्रम आहे.

**विद्यार्थ्यांच्या दंगलीची जबर किंमत**—उत्तर प्रदेशातील विद्यार्थ्यांनी अलीकडे केलेल्या दंगलीत ६ लाख रुपये किंमतीच्या सार्वजनिक मालमत्तेची हानी झाली असावी असा अंदाज आहे. हानीची पाहणी करण्याचे काम अजूनहि चालूच आहे. सगळ्यांत अधिक नुकसान सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालमत्तेचे झाले. दंगलीत अनेक कचेऱ्यांतील कागदपत्रे नाहीशी झाल्यामुळे नुकसानीचा अंदाज करणेसुद्धा कठीण झाले आहे. शहरांपैकी कानपूरचे नुकसान सर्वांत अधिक झाले. त्यानंतर बरेलीचा अनुक्रम लागतो.

**कुटुंबनियोजनासाठी मध्यवर्ती खाते**—लोकसभेचे एक सभासद आणि लोकसंख्येच्या प्रश्नाचे तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर ह्यांनी मुंबई येथे बोलतांना असे सुचविले की कुटुंबनियोजनासाठी मध्यवर्ती सरकारने स्वतंत्र खातेच काढावे; त्यासाठी राज्यघटनेंत बदल करावा लागला तरीही तो करावा. कुटुंबनियोजनासाठी मंजूर करण्यात आलेली रक्कम योग्य रीतीने खर्च करणे असे खाते काढल्यास सुलभ होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. कुटुंबनियोजनाला उत्तेजन देण्यासाठी करपद्धतीचा उपयोगही त्यांनी सुचविला.

**शस्त्रवैद्यांच्या संघटनेची इमारत**—अखिल भारतीय शस्त्रवैद्यांच्या संघटनेने मद्रास येथे आपल्या मालकीची ७ मजली इमारत बांधण्यास प्रारंभ केला आहे. इमारतीसाठी मद्रास सरकारने जागा दिलेली आहे. बांधकामास २० लाख रुपये खर्च येणार आहे. तेथे एक वाचनालय, एक प्रेक्षकगृह, परिषदांसाठी १० दिवाणखाने, पाहुण्या डॉक्टरसाठी खोल्या, इत्यादी व्यवस्था करण्यात येईल. इमारतीचा पायाचा दगड १९६४ साली बसविण्यात आला होता.

**साबूदाण्याचा सहकारी कारखाना**—सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारा साबूदाणा तयार करण्याचा एक कारखाना सालेम येथे सरकारी प्रयत्नाने काढण्यात येणार आहे. कारखान्यात रोज २०० टन साबूदाणा तयार होईल. कारखान्यासाठी ६० लाख रुपयांचे भांडवल लागणार असून ते ३ हप्त्यांनी जमा करण्यात येणार आहे. पहिला हप्ता १५ लाख रुपयांचा आहे. भांडवल जमविण्यासाठी कमिटी स्थापन करण्यात आली आहे.

**शेतमालाचे निर्नियंत्रण**—ब्रह्मदेशच्या सरकारने शेतीच्या मालापैकी २० जिनसांवरील आणि समुद्रापासून मिळणाऱ्या ११ प्रकारच्या जिनसांवरील नियंत्रणे रद्द केली आहेत. ह्या मालाचा व्यापार करण्याची मुभा आता खाजगी व्यापाऱ्यांना व सहकारी संस्थांना देण्यात आली आहे. गेल्या जानेवारीत सरकारने ४२६ जिनसांवर नियंत्रणे बसविली. पण नंतर मालाच्या किमती भडकल्या व काळाबाजार फोफावला; म्हणून आता नियंत्रणे रद्द करण्यात आली आहेत.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

**( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )**

**: मुख्य कचेरी :** ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४, २५४७८१

**: विभागीय कचेरी :** महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ५,७८,२५,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ३,१९,७१,००० |
| ठेवी | ... रु. | ४९,५८,९६,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | ९९,८७,२५,००० |

**: शाखा :**

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



श्री. वा. काळे ह्यांची

कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके

**१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल, ३ तुमचे स्थान कोणते ?**




महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले

**"विजय" नांगर**

वापरा. ४, ६ व ८ बैली

फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय


बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

## अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे सुकाणू यशस्वीपणे संभाळणारे

# श्री. भाऊसाहेब थोरात



अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे विद्यमान चेअरमन व सहकारशक्तीचे संपादक श्री. भाऊसाहेब संतुजी थोरात हे संगमनेर तालुक्यातील लोकप्रियता संपादन केलेले शेतकरी समाजातील तरुण व धडाडीचे आणि पुरोगामी विचारसरणीचे कार्यकर्ते आहेत. भारतमातेच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये सत्याग्रही म्हणून त्यांनी केलेली देशसेवा सर्वांना माहीत आहेच. शालेय जीवनामध्ये वावरत असतानाच त्यांच्या मनावर म. गांधींच्या स्वातंत्र्य चळवळीची छाप पडली आणि त्यांनी राष्ट्रसेवादलासारख्या राष्ट्रीय संस्थेमध्ये कार्य करण्यास सुरुवात केली. सन १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये त्यांना कारावासाची शिक्षाही भोगावी लागली. अशा या राष्ट्रीय व पुरोगामी विचारसरणीची बैठक असलेल्या हुशार, तरुण व सन्मान्य परंतु अभ्यासू चिकित्सक कार्यकर्त्याच्या हाती जिल्हा सहकारी बँकेची सूत्रे यावीत हा लोकशाहीत समाजवादाचा विजयच म्हटला पाहिजे.

**संगमनेर तालुक्याला लाभलेले तरुण पुरोगामी नेतृत्व**

संगमनेर तालुका सुपरवायझिंग युनियन, संगमनेर तालुका शेतकी संघ, संगमनेर तालुका सहकारी ऑईल मिल, संगमनेर तालुका सहकारी कापूस जिनिंग प्रेस, यांसारख्या सहकारी संस्थांची त्यांनी आपल्या अंगी असलेल्या विविध गुणांनी प्रतिकूल परिस्थितीतही मोठ्या कुशलतेने जपणूक केली आणि या सहकारी संस्थांना यशस्वीपणे कीर्तीच्या अत्युच्चपदी विराजमान करण्यांचा प्रयत्न केला. संकल्पित संगमनेर सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीच्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न प्रथमपासूनच विशेष कारणीभूत आहेत. संगमनेर तालुक्याला लाभलेले भाऊसाहेबांचे तरुण, पुरोगामी व वैचारिक बैठकीचे खास अधिष्ठान असलेले नेतृत्व निश्चितच प्रगतीच्या दिशेने नेणारे असेच आहे, आणि यातच त्यांच्या कार्यकुशल धोरणाची चुणूक प्रकर्षाने दिसून येते.

**प्रतिकूल परिस्थितीत सहकारी संस्था जगविल्या**

सहकाराच्या व सार्वजनिक कार्य करण्याच्या अमाप उत्साहात या देशात अनेक सहकारी संस्था भराभर जन्माला येतात, व योग्य मार्गदर्शनाअभावी त्या तितक्याच वेगाने अस्तही पावतात. तथापि या कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांना उपयोगी व फायदेशीर ठरणाऱ्या सहकारी संस्था जन्माला घालून अतिशय प्रतिकूल काळातही त्या जतन करून त्यांची प्रगती क्रमशः करीत राहणे ही गोष्ट तितकी सोपी नाही. अनुकूल परिस्थितीत साधा कार्यकर्तादेखील संस्था यशस्वीपणे चालवू शकतो. परंतु स्वतःला चक्रव्यूहात गुरफटून घेऊन त्या चक्रव्यूहाचा यशस्वीपणे भेद करून बाहेर पडण्याची नीती भाऊसाहेबांना अवगत असल्याने, अतिशय कठीण काळातदेखील त्यांनी कार्य करून यश संपादन केले आहे.

गेली कित्येक वर्षे भीषण दुष्काळाखाली भरडल्या जाणाऱ्या संगमनेर तालुक्यात सहकारी चळवळीचे बीजारोपण सर्वप्रथम धाडसीपणाने भाऊसाहेबांनीच केले. दुष्काळी परिस्थितीत सहकारी संस्था जगविणे व त्यांची प्रगती साधणे या दोन्ही गोष्टी म्हणजे दोन वेगवेगळ्या महान समस्याच होत. या दोन्ही समस्यांना त्यांनी कुशलतेने हाताळून सहकारी संस्थांची जास्तीत जास्त प्रगती साधली आहे.

**शेतकऱ्यांच्या सर्वंकष विकासाचा ध्यास**

शेतकऱ्यांच्या विकासासाठी त्यांना आर्थिक मदत योग्य वेळी व सुलभपणे उपलब्ध व्हावी म्हणून जिल्हा सहकारी बँकांचा जन्म झाला. भारतातील सर्व जिल्हा सहकारी बँकांमध्ये अग्रगण्य असलेल्या सर्वश्रेष्ठ जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी विराजमान होण्याचा बहुमान भाऊसाहेबांना त्यांच्या कर्तृत्वाने लाभला. एवढा उच्चपदस्थ मान लाभला असतानादेखील त्यांच्या विनम्र स्वभावात व विचारात बदल झाला नाही. जगात जी माणसे अतिनम्रपणे वागली, तीच माणसे मोठी झाली. नेमकी हीच गोष्ट हेरून भाऊसाहेबांनी आपल्या कार्यास सुरुवात केली. बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर या बँकेमार्फत गरीबातल्या गरीब, अडाणी आणि सहकारी चळवळीपासून बरेच दिवस बाजूला असलेल्या गरजू शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीविकासासाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत कशी उपलब्ध करून देता येईल, व शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी ही बँक सर्वंकष फलदायी कशी बनविता येईल हाच एक ध्यास त्यांना सतत लागलेला आहे; आणि बँकेच्या आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीची गेले वर्ष-दीड वर्ष त्यांनी आपली पावले त्या दिशेने टाकून दुर्बल घटकांना सबल करण्याच्या अनेक महत्त्वाकांक्षी व धाडसी योजना कार्यान्वित करून शेतकरीजीवनाचा सर्वंकष विकास साधण्याचा प्रयत्न चालविला आहे. ही गोष्ट या ठिकाणी नमूद करावीशी वाटते.

भाऊसाहेबांसारखी निर्भीड, सालस परंतु निश्चयी माणसे जोपर्यंत सहकारी क्षेत्रात व सहकारी बँकेच्या नेतेपदी आहेत तोपर्यंत सहकारी चळवळीची व जिल्हा बँकेची प्रगती ही दिवसेंदिवस होतच राहणार.

### केसांच्या निर्यातीने परदेशीय हुंडणावळीची प्राप्ती

परदेशीय हुंडणावळीची प्राप्ती करून देण्याच्या बाबतीत भारताला माणसांच्या केसांच्या निर्यातीची बरीच मदत होत आहे. गेल्या वर्षी केसांच्या निर्यातीने ९० लाख रुपयांचे परदेशीय चलन मिळाले. येत्या तीन-चार वर्षांच्या कालात केसांच्या निर्यातीमुळे ३ ते ४ कोटी रुपयांपर्यंत परदेशीय चलन मिळू लागण्याची शक्यता आहे. १९६२ मध्ये भारताने केसांची निर्यात करून परदेशाकडून फक्त १६·५ लाख रुपये मिळविले होते. ह्या निर्यातीला आता बरीच तेजी आलेली आहे. कारण अमेरिकेच्या अर्थखात्याने चीनकडून आयात होणाऱ्या केसांच्या टोपांची व इतर वस्तूंची आयात बंद केली आहे. अमेरिका पश्चिम युरोपातील देशांकडून सौंदर्यवर्धनासाठी केसांचे टोप, कृत्रिम भुवया, इत्यादी वस्तू मागवीत असते. पश्चिम युरोपात तयार करण्यात येणाऱ्या ह्या वस्तू चीनकडून आयात करण्यात आलेल्या केसांच्या असत. केसांच्या निर्यातीबाबत पश्चिम जर्मनी हे चीनचे मोठे गिऱ्हाईक आहे. पश्चिम जर्मनीतील टोप करण्याच्या धंद्यासाठी लागणारे ८० टक्के केस चीनकडून आयात करण्यात येत असतात. अमेरिकेत आणि युरोपात टोप घालण्याची फॅशन गेल्या काही वर्षांत पुन्हा फोफावली आहे. त्यामुळेही भारतामधील केसांची मागणी वाढली आहे. इटलीत २५ टक्के स्त्रिया केसांचे टोप वापरतात. अमेरिकेत दरसाल २० लाख टोप खपतात. पुरुषांतही टोप वापरण्याची वृत्ती वाढत आहे. पण त्याचे कारण निराळे आहे. सेवानिवृत्त झालेले लोक नव्याने नोकरी मिळविण्यासाठी वरून काळे व कानशिलापाशी किंचित करडे केस असलेले टोप वापरतात. त्यामुळे त्यांना कमी वयाचा व अनुभवाच्या निशाणीचा असा दुहेरी फायदा मिळतो.

---

### खते बनविण्याचा सहकारी कारखाना

ठाणे जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारा खताचा एक कारखाना स्थापन करण्यात येणार आहे. त्याची वार्षिक उत्पादनक्षमता १ लाख, ३१ हजार टनांची असेल. कारखान्यासाठी लागणारे ११ कोटी रुपयांचे भांडवल महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने. आणि सहकारी बँका उभारणार आहेत. १९६९ सालात कारखाना खताची निर्मिती करू लागेल. कारखान्यासाठी कच्चा माल म्हणून लागणारे ८० हजार टन मीठ पालघर व डहाणू विभागांतून मिळविण्यात येईल. मुळात ह्या कारखान्यासाठी दिलेला परवाना एका खाजगी उद्योगपतीने मिळविला होता. परंतु आता त्याच परवान्याचा उपयोग करून सहकारी कारखाना उभारण्यात येत आहे.

### "रेडस्टार"चा आरोप


कम्युनिस्ट आणि अपक्ष देशांकडे पाठविण्यात येणाऱ्या अमेरिकन मिलिटरी ॲटॅचींच्या पत्नींना वॉशिंग्टन येथील हेरगिरीच्या शाळेत हेरगिरीचे शिक्षण दिले जाते, असा "रेड स्टार" पत्राने आरोप केला आहे.

---

### खादीचे साठे पडून आहेत

खादीच्या आणि हातमागाच्या कापडाचे प्रचंड साठे पडून असून विणकरांत बेकारी वाढत आहे, ह्याबद्दल खादी बोर्डाने चिंता व्यक्त केली आहे.



धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण...
परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्यानें धूरही होत नाही व
संकटेही उपस्थित होत नाहींत...

बहुधा, प्रत्येक दोन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.
शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारे, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळें संपादन केला आहे.
विनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलवितां येतात, इतकेंच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहाण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली जाते. ती निराळीच.
किर्लोस्कर डिझेल एंजिन्स
३ ते १५ हॉर्स पॉवर
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)
TOM & BAY KO:667-A MAR

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
वसूल भांडवल ... रु. ११·९१ लाख
रिझर्व्ह व इतर फंडस् ... रु. १६·०८ "
ठेवी ... रु. ४३८·०२ "
खेळते भांडवल ... रु. ४९०·७३ "
शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.

स्थापना १९१८


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.